। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव – ४२५००१
# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON - 425001

रौप्य महोत्सवी वर्ष २०१४–१५

जा.क्र.उमवि/२/कुका / 220 /२०१६ दि. १८/११/२०१६

**प्रति,**
मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख,
उमविशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग

**विषय :- "कुलगुरु - विद्यार्थी संवाद पर्व " सुरु करणेबाबत..**

महोदय/ महोदया,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माननीय कुलगुरु महोदय प्रा.पी.पी.पाटील यांनी दि. २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी पदभार स्वीकारला, स्वागत समारंभात त्यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी भरीव वेळ देईन असे आश्वासीत केले होते.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी व समस्या जाणून घेण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांनी **"कुलगुरु - विद्यार्थी संवाद पर्व "** ची स्थापना केली आहे. यात महिन्याच्या पहिल्या व तिस-या सोमवारी दुपारुन अर्धा दिवस मा. कुलगुरु महोदय प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. समस्यांचे स्वरुप लक्षात घेऊन, तात्काळ सोडविता येणा-या समस्यांचे निराकरण त्याच ठिकाणी स्वत: माननीय कुलगुरु महोदय संबंधीत विभागांच्या प्रमुखां समवेत करणार आहेत. काही समस्यांची कालमर्यादा निश्चित करुन संबंधीत विभागांच्या अधिका-यांशी चर्चा करुन त्या समस्यांचा निपटारा लवकरात लवकर करण्यात येऊन त्याचा आढावा मा. कुलगुरु महोदय घेणार आहेत.

या संवाद पर्वाचा शुभारंभ सोमवार दि. २१ नोव्हेंबर, २०१६ रोजी दुपारी २.३० वाजता मा. कुलगुरु महोदय यांच्या दालनात होणार आहेत.

कृपया संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ प्रशाळा यांनी संवाद पर्वाच्या संबंधीची सूचना दर्शनी फलकावर लावावी व आपल्या विद्यार्थ्यांना **"कुलगुरु - विद्यार्थी संवाद पर्व "** बाबत अवगत करावे.

(प्रा. अ.म. महाजन)
**कुलसचिव**

**सोबत** - वरीलप्रमाणे

**प्रत -**
१) मा. कुलगुरु कार्यालय, उमवि, जळगाव
२) मा. संचालक/ विभागप्रमुख/ नियंत्रक अधिकारी, विद्यापीठातील प्रशासकीय विभाग

D/Shivade/General letter

पत्र पेटी क्र. : ८०,उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७–२२५७१००,२२५८४२८,२२५८४२९, फॅक्स क्र. : ०२५७–२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon
Telephone Nos.: 0257-2257100,2258428,2258429, Fax Nos. : 0257-2258403, 406 E-mail : registrar@nmu.ac.in